२०१०-११ आर्थि


# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य,मध्यवर्ती इमारत,पुणे-४११ ००१.

Web:www.dirde.org E-mail:info@dirhe.org.in.

फोन नं.०२०/,२६१२६९३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/एकलव्य/नविन मंजूरी/२०१०-११/१४अई /६८३ दि.१७.७.२०१०

**परिपत्रक :-**

0 6 AUG 2010

कुलसचिव कार्यालय
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ
नांदेड-४३१६०६
आ. क्र. 5326 दिनांक 16.8.10

प्रति,

१) कुलसचिव,
महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे.

२) विभागीय शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण),
पुणे/मुंबई/कोल्हापूर/औरंगाबाद/नागपूर/नांदेड/
जळगांव/अमरावती.

**विषय :** **पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेणा-या पात्र विद्यार्थ्यांची एकलव्य आर्थिक सहाय्यासाठी आवेदनपत्रे सादर करणेबाबत. नविन मंजूरी सन २०१०-२०११.**

**संदर्भ** : शासन निर्णय क्र.एससीएच/१०९५/(८१)/मशि-४,दि.७ फेब्रुवारी,१९९६.

संदर्भांकित शासन निर्णयान्वये कला,वाणिज्य,विज्ञान व विधी या विद्याशाखांच्या अंतर्गत पदव्युत्तर शिक्षण घेणा-या आणि विहित अटी पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र शासनाने सन १९९५-९६ या वर्षापासून एकलव्य आर्थिक सहाय्य योजना सुरु केलेली आहे.

२/- आपल्या कार्यक्षेत्रातंर्गत सन २०१०-२०११ या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या पात्र विद्यार्थ्यांकडून दि.३०/०९/२०१० अखेरपर्यंत विहित नमुन्यात अचूक व परिपूर्ण भरलेली आवेदनपत्रे सहपत्रासह मागविण्यात येत आहेत.सदर प्रस्ताव स्विकारण्याचा अंतिम दि.३०.९.२०१० असून त्यानंतर प्राप्त झालेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

३/- एकलव्य आर्थिक सहाय्य योजनेबाबतची सविस्तर माहिती संदर्भिय शासन निर्णयामध्ये नमूद केलेली आहे.एकलव्य आर्थिक सहाय्यासाठी पात्रतेच्या प्रमुख अटी खालीलप्रमाणे आहेत.

१. पदवी परीक्षेत विज्ञान शाखेत किमान ७० टक्के गुण, तर कला,वाणिज्य,विधी शाखेत किमान ६० टक्के गुण मिळविलेले असावेत. ( शासनाकडून प्राप्त आर्थिक तरतूदीनुसार गुणानुक्रमे जास्त गुणांनुसार अर्जाचा विचार करण्यात येईल.)

२. संबंधित विद्यार्थ्यांचे व त्याच्या आई-वडिलांचे/पालकाचे सर्व मार्गानी मिळून मागील आर्थिक वर्षाचे ( एप्रिल २००९ ते मार्च २०१०) वार्षिक उत्पन्न रु.७५,०००/- पेक्षा कमी असावे.

३. पदव्युत्तर द्वितीय वर्षासाठी आर्थिक सहाय्याचे नुतनीकरण मंजूर करण्यास पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षी किमान ५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. किमान वार्षिक ७५ टक्के नियमित उपस्थिती आवश्यक आहे तसेच चांगली वर्तणूक असणे आवश्यक आहे. याबाबत प्राचार्य/विद्यापीठीय विभाग प्रमुख यांचे सुस्पष्ट प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षी अनुत्तीर्ण असलेल्या व एटीकेटी मिळालेल्या विद्यार्थ्यांना नुतनीकरण मंजूर करता येत नाही. याची कृपया नोंद घ्यावी तसेच शासनाकडून प्राप्त होणा-या आर्थिक तरतूदीच्या आधीन

राहून गुणवत्तेनुसार गुणानुक्रमे संबंधित विद्यापीठनिहाय मंजूरी देण्यात येईल. त्यामुळे विहित गुणांची अट हे सांगून एकलव्य आर्थिक सहाय्य न मिळाल्यास कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही अशा सुचना बोर्डावर लावाव्यात.

४. हया योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना रु.५०००/- प्रतिवर्षी आर्थिक सहाय्य देण्यात येते.

५. एकलव्य आर्थिक सहाय्याबाबत विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेले नविन मंजूरीचे आवेदनपत्रे विद्यापीठे/महाविद्यालये यांनी त्यांचे स्तरावर जबाबदारीने तपासून न पाहता पाठविली जातात असे संचालनालयाच्या निदर्शनास आलेले आहे म्हणून पात्र विद्यार्थ्यांना एकलव्य आर्थिक सहाय्य मंजूर करणेकामी अडचणी निर्माण होतात व कार्यालयाचा वेळ खर्च होतो. विद्यार्थ्यांस आर्थिक सहाय्य मिळण्यास विलंब होऊ नये किंवा विद्यार्थी आर्थिक सहाय्यापासून वंचित राहू नये म्हणून नविन मंजूरीचा प्रस्ताव सोबत दिलेल्या सूचनाप्रमाणे विद्यापीठ व महाविद्यालये यांनी प्रथम त्यांचे स्तरावर अर्ज तपासूनच अंतिम मंजूरीसाठी या संचालनालयाकडे दिलेल्या विहित मुदतीतच पाठविण्यात यावेत. लाभार्थी विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे अचूक व परिपूर्ण भरावीत म्हणून सदरचे परिपत्रकांची प्रत व सूचनांची प्रत फलकावर लावावी.तसेच सदरचे प्रस्ताव हे फक्त विद्यापीठे/महाविद्यालयामार्फतच स्विकारुन विचारात घेतले जातील.

६. **अपूर्ण असलेल्या व बिनचूकपणे न भरलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

७ सोबत आवेदनपत्रे/वार्षिक प्रगती अहवाल परिपत्रक व सूचनापत्रक जोडली आहेत त्याप्रमाणे आपण आपले कार्यक्षेत्रातील सर्व शासकीय व अशासकीय महाविद्यालयांना लवकरांत लवकर पाठविण्यात यावेत याबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रत या संचालनालयास पाठविण्यात यावी.

८. **विद्यार्थ्यांनी त्यांच्या नजिकच्या बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत/राष्ट्रीयकृत बँकेत बँक खाते उघडणे बंधनकारक असून,विद्यार्थ्यांनी त्याचा खाते क्रमांक,बँकेचा संपूर्ण पत्ता,बँक शाखा,शाखा कोड नंबर तसेच बँकेचा एमआय सीआर कोड इत्यादी माहिती बिनचूकपूणे अर्जात नमूद करावी.**

**शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य,पुणे-१,**
**यांचेकरिता.**

## एकलव्य आर्थिक सहाय्य योजना
## आवेदनपत्र भरताना पाळावयाच्या सूचना

१. आवेदनपत्रातील पृष्ठ क्र. १ वरील विद्यार्थ्यांच्या पासपोर्ट आकाराच्या फोटोग्राफवर संबंधित प्राचार्य/विद्यापीठीय विभाग प्रमुख यांची सही व शिक्का आवश्यक.

२. पृष्ठ क्र. १ वरील रकाना ३ मध्ये विद्यार्थ्यांचे पालक म्हणून वडिलांचे ऐवजी आईचे नांव असल्यास व वडिल हयात नसल्यास, त्यासंबंधी सक्षम अधिकाऱ्याने दिलेला मृत्यू दाखला जोडणे आवश्यक, तसेच आई, वडिल विभक्त असल्यास घटस्फोट घेतल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यासमोर केलेले प्रतिज्ञापत्र आवश्यक.

३. पृष्ठ क्र. १ वरील रकाना ३ मध्ये विद्यार्थ्यांचे आडनांव व वडिलांचे/आईचे आडनांव यात काही तफावत आढळून आलेले आहे. काही विद्यार्थी वडिलांचे कुळ आडनांव ऐवजी आडनाव म्हणून जात लावतात अशा आडनांवाच्या तफावतीतबाबत संबंधित विद्यार्थ्यांच्या वडिलांनी सक्षम महसूल अधिकारी अथवा प्रथम वर्ग दंडाधिकारी यांचेसमोर केलेले प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे.

४. पृष्ठ क्र.१ वरील रकाना ३(ब) मध्ये वडिलांचा/आईचा व्यवसाय स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक.

५. पृष्ठ क्र.१ वरील रकाना ३(क) व ३(ड) मध्ये नमूद केल्याप्रमाणे वडिल/आई भारताचे नागरिक असल्याबाबतचे राष्ट्रीयत्वाचे प्रमाणपत्र व राज्याचे रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.

६. पृष्ठ क्र.२ वरील रकाने अस्पष्ट, संदिग्ध व चुकीचे भरलेले असतात, ते अचूक व स्पष्ट व पूर्ण भरणे आवश्यक.

७. पृष्ठ क्र.३ वरील संबंधित विद्यार्थ्यांच्या आई/वडिलांनी/पालकांनी सादर करावयाच्या उत्पन्नविषयक प्रतिज्ञापत्र सर्व रकाने स्पष्ट व अचूक भरणे आवश्यक.

८. पृष्ठ क्र.३ व ४ वरील उत्पन्नाच्या बाबींशी निगडीत असलेले रकाने ३(अ), १(ब), (ब)२, (ब) ३ व (ब)३, २ मधील संपूर्ण माहिती स्पष्ट व अचूक भरणे आवश्यक.

९. पृष्ठ क्र.३ व ४ वरील आई/वडिलांनी केलेल्या निवेदनावर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी/नोटरी पब्लिक अथवा सक्षम महसूल अधिकारी यांची सही, शिक्का आवश्यक (निवेदनावर विशेष कार्यकारी अधिकारी/गटविकास अधिकारी/पंचायत समिती सभापती/तलाठी/सरपंच/प्राचार्य व राजपत्रित अधिकारी व मान्यवर व्यक्ती यांची सही, शिक्का ग्राह्य धरता येत नाही.)

१०. पृष्ठ क्र.५ वरील मागीलवरी व्यवसाय, आई/वडिल यांचा व्यवसाय, दुकान, टपरी, किराणा सामानाचे दुकान, इलेक्ट्रीक साहित्याचे दुकान, इलेक्ट्रॉनिक दुरुस्ती व्यवसाय, जनरल स्टोअर्स इ. व्यवसायापासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या प्रमाणपत्रावर सक्षम आयकर अधिकारी यांची सही व शिक्का आवश्यक.

११. शेती व्यवसाय करणाऱ्या पालकांचे पृष्ठ क्र.५ वरील उत्पन्नाबाबतचे प्रमाणपत्रातील शेतजमीन बाबतची माहिती पूर्ण व अचूक भरणे आवश्यक व संबंधित तहशीलदार अधिकारी यांची प्रमाणपत्रावर सही व शिक्का आवश्यक. /नायब तहसिलदार यांची प्रमाणपत्रावर सही व शिक्का ग्राहय धरला जाणार नाही.

१२. वरील रकाना १० व ११ मध्ये नमूद केलेल्या व्यवसायाखेरीज इतर उत्पन्नाच्या बाबींसंबंधी (उदा. मजुरी, खाजगी नोकरी, सरकारी नोकरी, सेवानिवृत्त पालक इ.) मागील वर्षाचे उत्पन्नाबाबतचे सक्षम तहशीलदार अधिकारी यांचे प्रमाणपत्र आवश्क, तसेच पालक जेथे खाजगी/सरकारी नोरीत असेल तेथील मालकांचेही उत्पन्नाबाबतचे प्रमाणपत्र.

१३. आई/वडिल सेवानिवृत्त असल्यास, सेवानिवृत्ती वेतन ज्या बँकेतून/कोषागारातून घेतले जाते, तेथील सक्षम अधिकाऱ्याचे उत्पन्नाबाबचे प्रमाणपत्र आवश्यक. (तसेच आई/वडिल यांनी सेवानिवृत्तीनंतर मिळालेली रक्कम बँकेत ठेव योजनेत गुंतविलेली असल्यास, त्यावरील मिळालेले व्याजाचे उत्पन्न + सेवानिवृत्ती वेतन यांचा उत्पन्नाच्या दाखल्यात समावेश करावा.)

टीप - आवेदन पत्रातील पृष्ठ क्र.१ वरील रकाना ३ ब मध्ये आई/वडील सेवानिवृत्त झाल्याचे वर्ष व दिनांक नमूद करावा.

१४. पृष्ठ क्र.६ वरील रुजू अहवाल अचूक व पूर्ण भरुन संबंधित विद्यापीठ विषय विभाग प्रमुख/महाविद्यालयाचे प्राचार्य यांची सही व शिक्का आवश्यक.

१५. पृष्ठ क्र. ६ वरील महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असल्याबाबतचे प्रमाणपत्र अचूक व पूर्ण भरुन (प्रमाणपत्रामध्ये राज्यातील वास्तव्याचा कालावधी नमूद करणे आवश्यक) सक्षम जिल्हाधिकारी/तहशिलदार यांची प्रमाणपत्रावर सही व शिक्का आवश्यक.

१६. पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यामध्ये खंड पडलेला असल्यास, त्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यासमोर केलेले प्रतिज्ञापत्र व विद्यापीठाचे/महाविद्यालयाचे प्रमाणपत्र आवश्यक.

१७. आवेदनपत्रासोबत पदवी अभ्यासक्रमाच्या साक्षांकित केलेल्या गुणपत्रिकांच्या प्रती जोडणे आवश्यक.

१८. ज्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षी एकलव्य आर्थिक सहाय्य मंजूर झालेले नाही, अशा विद्यार्थ्यांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या आवेदन पत्रांचा विचार केला जाणार नाही.

१९. आर्थिक सहाय्याचा प्रस्ताव संस्थेच्या रितसर मुखपत्रासह पाठवावा.

## वार्षिक प्रगती अहवाल
## एकलव्य आर्थिक सहाय्य योजना
## सन २०० - २००

१. विद्यार्थ्यांचे (लाभार्थीचे) संपूर्ण नांव - ----------------------------------------

२. सदर विद्यार्थी सन २०० मध्ये- ----------------------------------------
ज्या विद्यापीठीय विभागात/महाविद्यालया शिकत आहे - ----------------------------------------
त्या विद्यापीठाचे/महाविद्यालयाचे नांव- ----------------------------------------

३. सन २०० मध्ये उत्तीर्ण केलेली विद्यापीठीय/महाविद्यालयीन ----------------------------------------
पदव्युत्तर भाग-१ ची परीक्षा व त्या परीक्षेत प्राप्त केलेले एकूण गुण व
गुणांची टक्केवारी.

४. या संचालनालयाच्या ज्या मंजूरी आदेशान्वये सदर विद्यार्थ्यास - ----------------------------------------
सन २०० मध्ये सदर आर्थिक सहाय्य नव्याने मंजूर करण्यात आले ----------------------------------------
त्या मंजूरी आदेशाचा क्रमांक व दिनांक

५. सदर विद्यार्थ्यांस सन २०० मध्ये राज्य शासनाची अथवा केंद्र शासनाची----------------------------------------
अन्य शिष्यवृत्ती/विद्यावेतन/सहाय्य इ.मंजूर वा प्रदान करण्यात आले होते काय १----------------------------------------
तसे असल्यास त्याबाबतचा संपूर्ण तपशील- ----------------------------------------
(वर्ष,मंजूर रक्कम,कालावधी इ.) तसेच सदर शिष्यवृत्ती सन २०० मध्ये----------------------------------------
मंजूर करण्यात आलेली आहे काय १ ----------------------------------------

६. सन २०० मध्ये सदर विद्यार्थ्यांची दिसून आलेली वर्तणूक व वर्गातील----------------------------------------
उपस्थितीची टक्केवारी - ----------------------------------------

(७. सदर नुतनीकरण मंजूरीबाबत विद्यापीठीय विभाग प्रमुखांचे/महाविद्यालयाचे- ----------------------------------------
प्राचार्य यांची शिफारसें ----------------------------------------

ठिकाण----------------------------

दिनांक / /२००

८.

१. बँक ऑफ महाराष्ट्र/राट्रीयकृत बँकेचे खाते क्रमांक.
२. बँकेचा संपूर्ण पत्ता.
३. बँक शाखा कोड नंबर.
४. बँक एमआय सीआर कोड क्रमांक

संबंधित विद्यापीठीय विभागप्रमुख/
महाविद्यालयीन प्राचार्य यांची स्वाक्षरी व
पदनामाचा शिक्का

संबंधित विद्यापीठीय विभाग प्रमुखांचे/
महाविद्यालयीन प्राचार्यांचे संपूर्ण नांव----------------------------------------

**टिप :** ज्या विद्यार्थ्यांना मागील वर्षी सन २००९-१० मध्ये प्रथम मंजूरी प्राप्त झाली (प्रथम वर्षासाठी सदर योजनेचा लाभ मिळाला आहे) अशा विद्यार्थ्यांची माहिती वरील नमुन्यात देऊन सोबत प्रथम वर्ष पास झाल्याची गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडून दि.३१.८.२०१० पूर्वी या संचालनालयास पाठवावीत.सदर मुदतीनंतर प्राप्त वार्षिक प्रगती अहवालाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.